Email - Info@maharashtracrimetimes.com

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंक: २६ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार २५ सप्टेंबर २०१८ ते सोमवार १ ऑक्टोबर २०१८

मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019

३ | मेट्रोची कारशेड 'आरे'तच !

सोन्याच्या दरात मोठी वाढ, चांदीच्या भावात घसरण | ४

## गुजराती उद्योगपती बँकांना ५ हजार कोटींचा चुना लावून परदेशात फरार?



**नवी दिल्ली (सम्यक कासारे)- भारतात बँकांना चुना लावून परदेशात पळून गेलेल्यांच्या पक्तींत आता आणखी एकाचा समावेश झाला असल्याची माहिती समोर आली आहे. ५ हजार कोटी रुपयांच्या बँक घोटाळ्यातील आरोपी असलेला गुजरातमधील स्टर्लिंग बायोटेकचा मालक नितीन संदेसरा हा नायजेरियात पळून गेल्याची शक्यता आहे. यापूर्वी विजय मल्ल्या, नीरव मोदी आणि मेहुल चोक्सी यांनी देशातील बँकांना हजारो कोटींचा चुना लावला आहे. यात आत संदेसरानेही परदेशात पलायन केले आहे.**

नितीन संदेसरा सुरुवातीला दुबईत असल्याची चर्चा होती. मात्र, तो भावासह कुटुंबियांना घेऊन नायजेरियाला पळून गेल्याची शक्यता अंमलबजावणी संचलनालय (ईडी) आणि सीबीआयमधील अधिकाऱ्यांना वाटत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळते. तो नायजेरियाला पळून गेला असेल तर त्याला भारतात आणणे कठीण आहे. कारण भारताचा आणि नायजेरियाचा प्रत्यार्पणाचा कोणताही करार नाही. यामुळेच संदेसरा नायजेरियात जाण्याची शक्यता जास्त आहे. याबाबत एका अधिकाऱ्याने सांगितले की, ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात नितीन संदेसराला दुबईमध्ये ताब्यात घेण्यात आले होते अशी चर्चा सुरु होती. मात्र, यात कोणतेही तथ्य नूसन तो आणि त्याचे कुटुंबीय त्यापूर्वीच नायजेरियाला गेळे असतील.

भारतीय तपास संस्थांकडून संदेसरा याच्या अटकेसाठी संयुक्त अरब अमिरातीच्या संबंधित विभागाला विनंती करण्यात येणार आहे. याशिवाय त्याच्या कुटुंबाविरोधात रेड कॉर्नर नोटिस काढण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. अद्याप संदेसराविषयी कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नाही. तो भारतीय पासपोर्टवर नायजेरियात आहे की इतर कोणत्या देशाचा पासपोर्ट त्याच्याकडे आहे याची माहिती नाही. सीबीआय आणि ईडीने वडोदरा येथे असलेल्या स्टर्लिंग बायोटेकच्या नितीन, चेतन आणि दिप्ती संदेसरा, राजभूषण दीक्षित, चार्टड अकाउंटंट यांच्याशिवाय आणखी काही लोकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## हिमाचल प्रदेशात ढगफुटी

## पुराने हाहाकार, १२६ रस्ते बंद पडले

**शिमला (सुनील आढाव)-** हिमाचल प्रदेशात अतिवृष्टी आणि पुराने थैमान घातला आहे. गेल्या ४८ तासांपासून सुरूच असलेल्या पावसाने सर्वत्र हाहाकार आहे. मुसळधार पावसाने कुल्लू-मनाली राष्ट्रीय महामार्गासह १२६ रस्ते बंद पडले आहेत. राष्ट्रीय महामार्गावर कुल्लूच्या ओट येथे ढगफुटीने १९ लोक अडकले होते. त्यांना हेलिकॉप्टरने बाहेर काढून विमानतळावर सुखरूप सोडण्यात आले. यासंदर्भात फोटो आणि व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. त्यापैकीच एका व्हिडिओमध्ये अख्खी बस आणि अख्खे ट्रक पुराच्या पाण्यात वाहून जाताना दिसून



येतात. पुरात अडकलेल्या सर्वच नागरिकांना बाहेर काढण्यासाठी ठिक-ठिकाणी बचाव मोहिमा सुरू आहेत.

कुल्लूच्या पोलिस उपायुक्तांनी नागरिकांना नदी, नाल्यांपासून दूर राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. सोबतच, अतिवृष्टीच्या परिस्थितीत उंच ठिकाणी राहावे असे आवाहन केले जात आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, राज्यात सर्वात वाइट परिस्थिती मंडी आणि हमीरपूर जिल्ह्यांत आहे. येथे जवळपास सर्वच नद्यांना पूर आले आहे. चंबा जिल्ह्याला जोडणाऱ्या शंभर वर्षे जुन्या शितला ब्रिजला सुद्धा दरी पडली आहे. तर रोहतांग दर्रामध्ये बर्फवृष्टीमुळे २८ लोक अडकले आहेत. मनालीत व्हॉल्वो बस आणि कुल्लूत चक्क ट्रक पुराच्या पाण्यात वाहून गेले आहेत. या दोन्ही घटनांचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

## मोदी 'चोरांचे सरदार', राहुल गांधींचा पुन्हा हल्ला

**नवी दिल्ली (योगेश होळंब)-** राफेल विमान करारावरुन काँग्रेस सातत्याने भाजपला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करत आहे. या प्रकरणी काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींवरच निशाणा साधला आहे. सोशल मीडिया, प्रेस कॉन्फरन्स, जाहीर सभा प्रत्येक ठिकाणी त्यांचे शाब्दिक वार सुरु आहेत. आरोप-प्रत्यारोप होत असतानाच राहुल गांधींनी पंतप्रधान मोदींवर हल्लाबोल करत त्यांना 'कमांडर इन थीफ' अर्थात 'चोरांचे सरदार' असल्याचं म्हटलं आहे.

याआधी राहुल गांधींनी नरेंद्र मोदी यांच्यासाठी 'चोर' या शब्दाचा वापर केला होता. 'गली गली में शोर है, हिंदुस्तान का चौकीदार चोर है,' असं राहुल गांधी म्हणाले होते. राहुल गांधी यांनी आज आपल्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवरुन एक व्हिडीओ ट्वीट केला आहे. यामध्ये राफेल कराराबाबत सांगितलं आहे. 'या करारासाठी भारत सरकारने मला अंबानींच्या रिलायन्स या कंपनीचं नाव सुचवलं होतं आणि त्यांच्याकडे कोणताही पर्याय नव्हता. यानंतर दसॉल्टने अंबानींसोबत चर्चा केली.



भारत सरकारने सुचवलेल्या मध्यस्थाची निवड आम्ही केली,' असं फ्रान्सचे माजी अध्यक्ष फ्रान्स्वा ओलांद यांचं म्हणणं असल्याचं फ्रेन्च डिजिटल व्हिडीओ पब्लिशर ब्रुट सांगत आहेत. व्हिडीओमध्ये ब्रुट हे 'मीडियापार्ट' या वेबसाईटला दिलेल्या मुलाखती मधील फ्रान्स्वा ओलांद यांच्या मुद्द्यांचा हवाला देत आहेत.

## जम्मू-कश्मीरमध्ये ५ दहशतवाद्यांचा खात्मा

**तंगधर (अभिजीत येरल्लु)-** जम्मू-कश्मीरमधील तंगधर सेक्टरमध्ये शनिवारपासून सुरू असलेल्या चकमकीत सुरक्षा दलाला यश मिळाले आहे. सोमवारी सुरक्षा दलाने कुपवाडामधील



तंगधर सेक्टरमध्ये तीन दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. यामुळे या दहशतवादविरोधी मोहिमेत सुरक्षा दलाने एकूण ५ जणांचा खात्मा केला आहे. दरम्यान, या चकमकीत एक जवान शहीद झाला आहे. ही चकमक अद्याप सुरू आहे.

करनाह येथील लष्कराच्या ईगल छावणीजवळ काहीजण घुसखोरी करत असल्याचे जवानांच्या लक्षात आले. त्यानंतर जवानांनी त्यांना आत्मसर्मपण करण्याचे आवाहन केले. पण घुसखोरांनी जवानांच्या दिशेने गोळीबार करण्यास सुरुवात केली. त्यास २० जाट युनिटच्या जवानांनीही चोख प्रत्युत्तर दिले. शनिवारी सुरू झालेली ही चकमक अदयापही सुरू आहे. जवानही दहशतवाद्यांना जशास तसे उत्तर देत आहेत.

## वॅट कमी करून पेट्रोल-डिझेलचे दर सरकारने तात्काळ आटोक्यात आणावेत - जयंत पाटील

**मुंबई (विशाल कारंडे)-** महाराष्ट्रात सर्वत्र ठिकाणी जपळपास ९०रू पर्यंत पेट्रोलच्या किमती पोहचल्या आहेत. नांदेड-परभणीकरांना तर ९२ रु. किंमत द्यावी लागत आहे. एवढा प्रचंड महागाईचा आगडोंब महाराष्ट्रात व भारतात उसळलेला आहे. जे नरेंद्र मोदी व त्यांचे प्रमुख नेते तसेच सर्व मंत्रिमंडळात बसलेले नेते हे पेट्रोल दर ५०-६० रुपये झाले तरी ओरडत होते तीच मंडळी आज नव्वदीवर पेट्रोल जाऊन पोहचले तरी काहीच बोलत नाही. महाराष्ट्रातल्या सामान्य माणसाचे जगणे आता कठीण झाले आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केले आहे. त्यात महाराष्ट्राचे अर्थमंत्री म्हणतात की पेट्रोल जीएसटीच्या कक्षेत घेण्यास



आमची हरकत नाही. परंतु जीएसटीमध्ये पेट्रोल घेतील तेव्हा घेतील, त्यासाठी अनेक राज्यांची परवानगी लागते. पण पेट्रोलवरील बेसुमार वॅट हा सरकारच्या हातात आहे. त्याची किंमत एवढी कमी करा की किमान १५ रु. दर कमी होतील, अशी सूचना पाटील यांनी केली. पेट्रोल- डिझेलच्या किमती कमी करण्याकडे राज्य सरकार का लक्ष देत नाही, असा प्रश्न उपस्थित करतानाच मुख्यमंत्र्यांनी या देशात पेट्रोल-डिझेलच्या दरात महाराष्ट्र अग्रेसर रहावे म्हणून ही मर्दुमकी आपण गाजवत असाल तर गरीबांनी महाराष्ट्रात जगायचे कसे असे त्यांनी विचारले. वॅट हा कर महाराष्ट्र सरकारच्या कक्षेत आहे. जो बसवण्याचा, कमी करण्याचा, वाढवण्याचा आजही अधिकार महाराष्ट्र सरकारच्या हातात आहे.

## महाराष्ट्रातील शिक्षकांना गुजराती चॅनेलवरून धडे

**मुंबई (हर्षद परब)-** महाराष्ट्रातील अभ्यासक्रमाच्या पुस्तकात गुजरातीचे धडे छापून झाले आता मराठी शिक्षकांनाही गुजराती वाहिनीवरून धडे देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. शासनाचा हा निर्णय म्हणजे सरकारचा महाराष्ट्राचे संपूर्ण गुजरातीकरण आणि लांगुलचालन करण्याचा निषेधार्ह प्रकार असल्याची संतप्त टीका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांनी केली आहे. 'वंदे गुजरात'या गुजराती वाहिनीवरुन महाराष्ट्रातील शिक्षकांना धडे देण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे.

इयत्ता पहिली आणि आठवीचा अभ्यासक्रम नुकताच बदलण्यात आला आहे. या अभ्याक्रमासाठी संबंधित विषयांच्या शिक्षकांना येत्या २४ ते २६ सप्टेंबर रोजी व्हर्च्युअल प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाने दुरदर्शनच्या मराठी 'सह्याद्री'वाहिनीला डावलून वंदे गुजरात या वाहिनीची निवड केली आहे. शिक्षण विभागाच्या या निर्णयावर धनंजय मुंडे यांनी टीका केली आहे. सरकारला गुजरातीचे इतकेच प्रेम असेल तर महाराष्ट्राची राज्यभाषा गुजराती आणि गांधीनगर राजधानीच करून टाका, असा टोलाही मुंडे यांनी लगावला आहे.

## भारत अहंकारी; पाक PM इम्रान खान बरळले

**इस्लामाबाद (वृत्तसंस्था)-** पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून चर्चेसाठी साकडे घातले होते. मात्र काश्मीरात तिघा पोलिसांचे अपहरण करून हत्या करण्यात आल्याने आणि जवानांच्या कारवाईत ठार झालेला दहशतवादी बुरहान वानी याचे उदात्तीकरण करण्यासाठी पाक सरकारने टपाल तिकिटाचे अनावरण केल्यामुळे भारताने संभाव्य चर्चा रद्द केली आहे. यावर इम्रान खान यांनी नाराजी व्यक्त करत ट्विटरच्या माध्यमातून भारतावर टीका केली आहे.

इम्रान खान यांनी केलेल्या ट्वीटमध्ये म्हटले आहे की, भारत, पाकच्या संयुक्त बैठकीला भारताने नकार दिल्याने आपण नाराज असल्याचे म्हटले आहे. तर, आपण अनेक सामान्य लोकांना आपण मोठ्या पदावर गेलेलं पाहिलंय, मात्र त्यांच्याकडे दुरदृष्टीचा अभाव असल्याचेही ते



म्हणाले. न्यूयॉर्कमध्ये 'युनो'च्या महासभेदरम्यान भारत आणि पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांमध्ये द्विपक्षीय बैठक होण्याची शक्यता होती. मात्र, जवानांनी कंठस्नान घातलेला दहशतवादी बुरहान वानी याचे पाकिस्तानने उदात्तीकरण सुरू केले आहे. त्याच्या नावाने टपाल तिकिटाचेही अनावरण केले आहे. तसेच काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी शोपियाँमध्ये तिघा पोलिसांची हत्या केली आहे. पाकिस्तानकडून आगळीक सुरूच राहिल्याने प्रस्तावित बैठक रद्द करण्यात आल्याचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रवीशकुमार यांनी जाहीर केले आहे. तर दहशतवाद्यांना खतपाणी घालण्याचा मार्ग पाकिस्तान सोडत नाही, तोपर्यंत त्या देशासोबत चर्चा करण्यात काहीच अर्थ उरत नाही. या दोन्ही कारणामुळेच पाकसोबतची चर्चा रद्द करण्यात आली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## कर्नाटकात घमासानः तुम्ही राज्यात तर आम्ही केंद्रात

**बंगळूर (विकास देशमुख)-** भाजपने काँग्रेस-निजद युती सरकार अस्थिर करण्याचे प्रयत्न थांबवले नाहीत तर कर्नाटकातील जनतेने भाजपविरुद्ध बंड करून उठावे, असे वक्तव्य करणारे मुख्यमंत्री एच. डी. कुमारस्वामी यांच्याविरुद्ध भाजपने आंदोलन छेडले आहे. कुमारस्वामींवर राजद्रोहाचा गुन्हा नोंदवावा, अशी तक्रार भाजप नेत्यांनी पोलिस महासंचालक नीलमणी राजू यांच्याकडे केली आहे. त्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.

भाजपने बंगळुरात तसेच विविध जिल्ह्यांत मुख्यमंत्र्यांविरुद्ध मोर्चेही काढले. मुख्यमंत्री कुमारस्वामी यांनी गुरुवारी सायंकाळी भाजपच्या विरोधात वक्तव्य केले होते. देवेगौडा कुटुंब आणि युती सरकारच्या विरोधात कारवाया करणे भाजपने थांबवले नाही तर राज्यातील जनतेने भाजपविरुद्ध बंड पुकारावे, असे कुमारस्वामी म्हणाले होते. शुक्रवारी त्याचे पडसाद राज्यभरात उमटले.



विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक १०४ जागा जिंकलेला भाजप सत्तेपासून दूर असून केवळ ३७ जागा जिंकलेला राजकीय पक्ष राज्यात अधिकार चालवत असून, मनमानी कारभार करीत आहे.

## सौजन्य व्हॉट्सअप




## गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषण केल्याने २०२ मंडळांवर गुन्हे दाखल

**मुंबई (राकेश विश्वकर्मा)-** १३ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर या गणेशोत्सव काळात हायकोर्टाच्या आदेशाचे पालन न करता आवाजाची मर्यादा न पाळणाऱ्यांवर मुंबई पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. संबंध मुंबईत ध्वनिप्रदूषण केल्याप्रकरणी एकूण २०२ गणेशोत्सव मंडळांवर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती पोलीस आयुक्त मंजुनाथ सिंगे यांनी दिली. गणेशोत्सव कालावधीत हायकोर्टाच्या आदेशानुसर ६५ ते ७० डेसिबलपेक्षा अधिक आवाज करणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उचलला आहे. ध्वनी प्रदूषण करणाऱ्या २०२ मंडळावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गणशोत्सवाच्या पहिल्या दिवसापासून ते अनंत चतुर्दशीपर्यंत हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत असे सिंगे यांनी सांगितले. ध्वनिप्रदूषण करून न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश सर्व पोलिस ठाण्यांना देण्यात आल्याचे सिंगे म्हणाले.

## मुंबईत लालबागच्या राजाच्या विसर्जनावेळी बोट बुडाली; महिलेसह मुलावर उपचार सुरु, मोठा अनर्थ टळला

**मुंबई (अमोल गुडेकर)-** महाराष्ट्राचे आराध्य दैवत गणपती बाप्पाला दहा दिवसांच्या मुक्कामानंतर रविवारी भक्तीमय वातावरणार निरोप देण्यात आला. सोमवारी सकाळी नऊ वाजेदरम्यान लालबागच्या राजाचे विसर्जन गिरगाव चौपाटीवर करण्यात आले. यावेळी एक बोट पलटली. सुदैवाने बोट पलटल्याने बुडालेल्या व्यक्तींना पाण्यातून बाहेर काढण्यात फायर ब्रिगेडच्या अधिकाऱ्यांना यश आले आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मुंबई महानगरपालिकेचे पीआरओ तानाजी कांबळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, बोट पलटल्याने पाच जण पाण्यात पडले. या पाचही जणांचा पाण्यातून सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. या व्यक्तींची परिस्थिती गंभीर नसून त्यांना नायर रूग्णालयात दाखल करण्यात आले.



यासंदर्भात माहिती देताना नायर रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. रमेश भारमल म्हणाले की, गणपती विसर्जनादरम्यान बोट दुर्घटनेतील ४ व्यक्तींना रूग्णालयात दाखल केले. यामध्ये १ महिला, २ पुरुष आणि एका बालकाचा समावेश आहे. यामधील महिला आणि ५ वर्षीय लहान मुलाला श्वसनासंबंधीचा त्रास जाणवत आहे. २५ वर्षीय व्यक्तीच्या मानेला आणि ३२ वर्षीय रूग्णाच्या पायाला दुखापत झाली आहे.

या रूग्णांना डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. याशिवाय अजून एका व्यक्तीला रूग्णालयात आणण्यात आले आहे. बोट उलटण्याची दुर्घटना नेमकी कशी घडली, याचा तपास पोलिस आणि फायर ब्रिगेडकडून केला जात आहे.

## संपादकीय..

संपादक:- राकेश शंकर गोरे

# राजकीय साठमारीपासून लष्कर अलिप्तच हवे

शस्त्रास्त्रांच्या व्यापारात उत्पादक, खरेदीदार, दलाल व शस्त्रास्त्रांची चाचणी घेऊन पसंती देणारे अधिकारी यांना प्रचंड कमाई होत असते. देश विकसित असो, की अविकसित त्याला अपवाद नसतात. हुकूमशाही व्यवस्थेत त्याचा बोभाटा होत नाही. गेल्या काही दशकांत लोकशाही देशांत निवडणुका प्रचंड खर्चिक बनल्या आहेत. पक्षसदस्यत्वाच्या पाच-दहा रुपयांच्या निधीवर राजकीय पक्ष चालत नाहीत. भारतासारख्या महाकाय लोकसंख्येच्या देशात देशपातळीवरील निवडणुकीत हजारो कोटी रुपये खर्च केले जातात. हा पैसा कुठून येतो? मोठमोठ्या कंत्राटांतून, भांडवलदारांकडून, तसेच नैसर्गिक स्त्रोतांच्या लिलावातून होणाऱ्या वरकमाईतून डोळे दिपविणाऱ्या प्रचारमोहिमा चालतात. त्यामुळे स्वाभाविकच बोफोर्स तोफा किंवा राफेल लढाऊ विमानांच्या खरेदीचे व्यवहार संशयाच्या भोवऱ्यात सापडतात. देशाचे संरक्षण हा भावनिकदृष्ट्या संवेदनशील मुद्दा असल्याने सत्ताधारी आकाशातून जमिनीवर येतात. १९८४ च्या निवडणुकीत लोकसभेच्या चारशेवर जागा मिळविणारे राजीव गांधींचे सरकार पुढच्या निवडणुकीत १९७ जागा मिळाल्याने पराभूत झाले होते. २०१४ मधील निवडणुकीत २०४ वरून ४४ वर घसरलेल्या काँग्रेसला आता 'राफेल' व्यवहारातील कथित अनियमितता हा आशेचा किरण वाटणे स्वाभाविक आहे. या प्रकरणात भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस पक्ष एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांची राळ उडवीत असताना इतर विरोधी पक्ष मात्र गप्प आहेत. बोफोर्स प्रकरणात काँग्रेसच्या विरोधात डावे-उजवे-मध्यममार्गी साऱ्यांनी रान पेटविले होते. त्यामुळेच कदाचित, 'राफेल' व्यवहार स्वतः पुढाकार घेऊन तडीस नेणारे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मौन बाळगले आहे. संरक्षणमंत्री निर्मला सीतारामन यांच्यावर बचावाची जबाबदारी सोपवून ते निर्धास्त दिसतात. मात्र सीतारामन यांच्या खुलाशात विसंगती असून, या व्यवहाराशी संबंधित फ्रान्सचे माजी अध्यक्ष फ्रान्स्वा ओलँद आणि 'राफेल' बनविणाऱ्या दसाँ कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची वक्तव्ये मोदी सरकारची अडचण करणारी आहेत. सत्ताधारी आक्रमक पवित्रा घेऊन प्रत्यारोप करीत असले, तरी मुख्य मुद्याला ते भिडताना दिसत नाहीत. मात्र आजवरच्या सरकारांनी आपल्या बचावासाठी कधीही पत्करला नाही, असा मार्ग मोदी सरकार अनुसरताना दिसते आहे. हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल बी. एस. धनोआ, मध्य विभाग हवाई दलाचे कमांडर एस. बी. पी. सिन्हा, यांनी ५९ हजार कोटींच्या ३६ राफेल विमानांच्या खरेदीच्या सरकारच्या निर्णयाचे समर्थन केले आहे. माजी हवाईदल प्रमुख एस. कृष्णस्वामी यांनीही एका लेखाद्वारे या व्यवहाराला पाठिंबा देताना आक्षेप घेणाऱ्या विरोधकांना धारेवर धरले आहे. त्यातून नकळत लष्कर या वादात ओढले जाण्याचा धोका आहे.

राफेल हे चौथ्या पिढीचे बहुउपयोगी लढाऊ विमान असून, त्याच्या गुणवत्तेविषयी कोणीही आक्षेप घेतलेला नाही. भारतीय हवाई दलासाठी ४२ स्क्वॉड्रनची (एका स्क्वॉड्रनमध्ये १८ विमाने) आवश्यकता असताना ती संख्या ३१ वर आली आहे. 'मिग-२९'सारखी जुनी विमाने दोन वर्षांत काढून टाकावी लागणार असून, चीन आणि पाकिस्तान या दोन्ही सीमांवर संघर्ष उद्‌भवला तर मोठा कठीण प्रसंग गुदरणार आहे. पाकिस्तानकडे २० स्क्वॉड्रन लढाऊ विमाने आहेत, तर चीनकडे ८०० आधुनिक विमानांसह १७०० लढाऊ विमाने आहेत. २००० मध्ये वाजपेयी सरकारला हवाई दलातर्फे ४२ स्क्वॉड्रनची गरज कळविण्यात आली होती. त्यानंतर डॉ. मनमोहनसिंग सरकारने फ्रान्सकडून एक स्क्वॉड्रन (१८) 'राफेल' तयार स्वरूपात, तर सात स्क्वॉड्रन (१०८ विमाने) देशात सरकारी मालकीच्या 'हिंदुस्थान एअलोनॉटिक्स लि.'मध्ये तयार करण्याचे ठरविले होते. वाटाघाटी लांबत गेल्या आणि २०१४ मध्ये काँग्रेस पराभूत झाली. जुन्या समझोत्यात 'राफेल'चे तंत्रज्ञान मिळणार होते. नरेंद्र मोदींनी फ्रान्सच्या दौऱ्यात दहा एप्रिल २०१५ रोजी तेथील सरकारशी ३६ विमाने तयार स्वरूपात खरेदीचा करार केला. हवाई दलाच्या गरजेपेक्षा ही संख्या खूप कमी होती. शिवाय दोन्ही सरकारांमधील व्यवहारात किमतीत मोठा फरक असल्याने संशय निर्माण झाला. गुप्ततेच्या कलमाचा आधार घेत सरकार कराराचा तपशील जाहीर करीत नसले तरी फ्रान्सकडून त्याला हरकत नसल्याचे ओलँद यांनी काँग्रेसच्या शिष्टमंडळाला सांगितले होते. संशय दूर करण्यासाठी प्रमुख विरोधी पक्षांची बैठक घेऊन गुप्ततेच्या शर्तीवर कराराचा तपशील सांगून सरकार आपल्यावरील आरोप परतवून लावू शकले असते. तसे होताना दिसत नाही. उलट हवाई दलाचे आजी-माजी प्रमुख खुलासे करू लागल्यामुळे काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. पाकिस्तानात इश्कंदर मिर्झा अध्यक्ष असताना लष्करप्रमुख जनरल अयूब खान यांना संरक्षणमंत्री म्हणून मंत्रिमंडळात घेण्यात आले होते. सत्तारूढ पक्ष, तसेच विरोधक यांच्यातील लाथाळ्या, त्यांचे कच्चे दुवे हेरणाऱ्या अयूब खान यांची महत्त्वाकांक्षा उफाळून आली. त्यांनी राजकीय सत्ता ताब्यात घेतली. तेव्हापासून पाकिस्तानच्या मानगुटीवर लष्कर बसले आहे. बेमुवर्तखोर राजकारणी, लष्कर, सनदी नोकर आणि न्यायपालिका यांच्या भागीदारीतून पाकिस्तानच्या लोकशाहीचे मातेरे झाले. हे लोण इथेच थांबले नाही. भारतापाठोपाठ स्वतंत्र झालेल्या अनेक आशियाई देशांमध्ये लष्करी राजवटी आल्या. भारताचा प्रचंड आकार, त्यातील धार्मिक, भाषिक, सांस्कृतिक विविधता लक्षात घेता संपूर्ण देश मुठीत ठेवणे शिस्तीच्या लष्कराच्या आवाक्याबाहेर असल्याने तसा धोका नव्हता. तरीही लष्कर व इतर घटकांच्या भागीदारीतून तसे आव्हान उभे राहू नये याची काळजी घेत तेव्हाच्या नेतृत्वाने लोकशाही व्यवस्था बळकट करणारी संस्थागत उभारणी करण्याची दक्षता घेतली होती.

# 'तलाक'पीडितांना मुक्ती!

'तलाक-ए-बिद्दत' किंवा 'तोंडी तलाक' म्हणजेच तीन वेळा 'तलाक'चा उच्चार करून मुस्लिम महिलांना अक्षरशः वाऱ्यावर सोडण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी अखेर केंद्र सरकारने वटहुकूम जारी केला आहे. खरे तर गेल्या ऑगस्टमध्येच सर्वोच्च न्यायालयाने ही पद्धत बेकायदा, तसेच घटनाबाह्य असल्याचा निर्णय दिला होता. त्यामुळे



महिलांना दुय्यम वागणूक देणारी ही प्रथा कायद्याच्या माध्यमातून रद्द करण्याची गरज होती. केंद्र सरकारने तसा प्रयत्नही केला होता आणि लोकसभेत त्या विधेयकाला मंजुरीही मिळाली होती. मात्र, राज्यसभेत या विधेयकातील काही मुद्यांवर सर्वपक्षीय एकमत होऊ शकले नाही आणि त्यामुळे हे विधेयक संसदेत अडकून पडले होते. अर्थात, त्यामागे मतपेढ्यांचे राजकारण होते, हे सांगायला नकोच. आता केंद्र सरकारने यासंबंधात वटहुकूम जारी केल्यामुळे सामाजिक न्यायाच्या लढाईतील एक पाऊल पुढे पडले आहे, हे मात्र निश्चित. अर्थात, त्यामागील राजकारण लपून राहिलेले नाही. मतपेढ्यांच्या राजकारणास बळी पडून काँग्रेस, तसेच अन्य विरोधी पक्ष या विधेयकाला विरोध करीत असल्याचा आरोप तेव्हा भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी केला होता. त्यामुळेच आता या वटहुकमाचे पुढच्या सहा महिन्यांच्या आत कायद्यात रूपांतर करून घेण्यासाठी त्याला सर्व विरोधी पक्षांनी पाठिंबा देण्याची गरज आहे. ही बाब लक्षात घेऊनच सरकारच्या या निर्णयाची घोषणा करताना केंद्रीय कायदामंत्री रविशंकर प्रसाद यांनी यासंबंधात पाठिंब्यासाठी सोनिया गांधी यांना कळकळीचे आवाहन केले आहे.

केंद्र सरकारने जारी केलेल्या या वटहुकमातील तरतुदींनुसार आता 'तोंडी तलाक' हा फौजदारी, तसेच अजामीनपात्र गुन्हा ठरला आहे. मात्र, जामिनासाठी आरोपीने न्यायालयाकडे धाव घेण्याबाबतची तरतूद विधेयकाच्या मूळ मसुद्यात दुरुस्ती करून या वटहुकमात करण्यात आली आहे. ही दुरुस्ती महत्त्वाची आहे; कारण आरोपी गजाआड गेल्यास त्याचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या उद्‌ध्वस्त होण्याची शक्यता असते. त्यामुळे पुरोगामी महिला संघटनांनीच तशी मागणी केली होती. ती मान्य झाली आहे आणि त्यामुळे आता विरोधी पक्षही संसदेत या विधेयकाला मान्यता देतील, अशी आशा करता येते. 'केवळ टीव्हीवरील चर्चांमध्ये या विषयाला पाठिंबा देऊ नका; तर तो संसदेतही द्या!' हे रविशंकर प्रसाद यांचे आवाहन त्यामुळेच महत्त्वाचे आहे. खरे तर विवाह आणि घटस्फोट हे वैयक्तिक कायद्यांशी संबंधित मुद्दे आहेत आणि त्यात रुढी-परंपरांचा पगडा कमी-अधिक चालत राहिला असला, तरी या वटहुकमामुळे मुस्लिम महिलांचे आपणच कैवारी असल्याची प्रतिमा भाजप उभी करू पाहत आहे, यात शंका नाही.

## शब्दकोडे क्रमांक-२६



**आडवे शब्द:** १. उन्हाळ्यात दिलासा देणारा पाऊस ३. चामखीळ ४. पराजय ७. कौसल्यापुत्र ९. कर्ज देणारा १०. नवरदेवाकडील मंडळी १२. पंख १३. कपडालत्ता १६. तापविणारा सूर्य १८. गुजराथी नृत्यप्रकार १९. झोपडी २०. भांडण २१. बारा स्वारांच्या अक्षरांची मालिका उदा.क, का, की, कि, कु, कू, इत्यादी २३. चप्पल २४. लवकर, वेगाने २६. ख्रिश्चन धर्माचे प्रमुख धर्मगुरु २७. बारा वर्षाचा काळ २९. कोर्टातील कथन ३०. गीत, नृत्य, वाद्य यांचा संगम ३२. नवरा (ग्रा.) ३५. रमणीय ३६. धुंदी ३८. ज्ञानेश्वरीत उल्लेखलेला एक पक्षी ४०. श्रीमंत ४१. एक क्षार ४२. रस काढण्याचे यंत्र ४४. चिंतन ४५. अंत:करण ४६. तेज ४८. मध्यभागी ५०. प्रत्येक दिवशी ५२. वांग्याचा खमंग पदार्थ ५३. गुरांचा समुदाय ५४. मऊ ५६. कौरव पांडवांची कथा ५८. पुरुष, शूर पुरुष ५९. समीक्षा ६२. मदनपत्नी ६३. कपटी ६८. एक पालेभाजी ६९. परमेश्वर ७०. चिंता ७२. मिठी ७३. एकदम पडलेला शेणाचा गोळा ७४. अजागळ ७६. आशीर्वाद ७९. एकत्रित रडणे ८०. सुगंध ८१. बारावी रास ८२. तानाजीला दिलेली पदवी, शूर पुरुष

**उभे शब्द:** १. व्यर्थ बडबड, चऱ्हाट २. लग्नासाठी जमलेले गणगोत ३. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेणारी संस्था (फक्त आद्याक्षरे) ३अ. फुरसत ४. पुन्हा पुन्हा ५. घर ६. आशीर्वाद ७. असुर ८. नामशेष ९. सर्प ११. दुसऱ्याकडे भोजन घेणे, व्रतकाळात हे पाप समजतात १२. अनुमती १४. वाढलेला व्याप १५. वही १७. सोंगट्यांचे वस्त्र १९. झीज, नुकसान २०. पोते २१. दावा २३. हेलपाटा २५. पृथ्वी २६. कुबड २८. घागरा ३०. एकत्र गोळा करणे, जमविणे ३१. श्रीविष्णूचे नावडते फूल ३३. दशमुखी रावण ३४. चाक ३७. एक हिंस्त्र पक्षी ३८. झोंबणारे ३९. लिहिलेले वाचणारा ४०. सन्मानाची रक्कम ४३. पंकज ४४. माझे ४५. इच्छा ४७. अभिप्राय ४९. हत्यारांची, सामानाची पिशवी बहुदा न्हाव्याकडील ५०. इटलीची राजधानी ५१. लोखंड (हिंदी) ५२. ओहोटीच्या विरुद्ध ५३. पाषणहृदयी ५५. रसदार ५६. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा ५७. हिंदुस्थान ५८. मौज ६०. फणसाचा एक प्रकार ६१. नागपूरचे प्रसिद्ध फळ ६३. गाजावाजा ६४. तोटी ६६. खिडकीची काच ६७. यावर्षी ६८. नोकर ७१. आयुष्य ७५. पुरे! ७७. मादीच्या विरुद्ध

## थोडक्यात महत्वाचे

### रस्त्यावरील बेवारस गाड्यांबाबत सरकारला फटकारले

**मुंबई (प्रतिनिधी)-** रस्त्यावरील बेवारस गाड्यांच्या समस्येची गंभीर दखल घेत या गाड्या तातडीने हटवण्याबाबत पोलीस विभाग आणि मोटार वाहन विभागाला आवश्यक ते निर्देश देण्याचे आदेश दोन महिन्यांपूर्वी राज्य सरकारला देण्यात आले होते. मात्र या आदेशांची पूर्तता करणे तर दूर, उलट रस्त्यांची अडवणूक करणाऱ्या या गाड्या हटवण्याची जबाबदारी ही आपली



नाही, तर पालिकेची आहे, असे स्पष्टीकरण मुंबई पोलिसांतर्फे न्यायालयाला देण्यात आले. त्यावर संताप व्यक्त करत न्यायालयाने पोलिसांच्या आणि राज्य सरकारच्या भूमिकेचा समाचार घेतला. तसेच ही भूमिका धक्कादायक असल्याचे ताशेरे ओढत आदेशांची पूर्तता करण्यास शेवटची संधी राज्य सरकारला दिली. रस्त्यावरील बेवारस गाड्यांचा मुद्द्याबाबत टेकचंद खानचंदानी यांनी जनहित याचिका केली होती. तसेच या गाड्या हटवण्याबाबत पोलीस, पालिका, मोटार वाहन विभागातर्फे काहीच केले जात नसल्याचा आरोपही केला होता. या गाड्यांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याचाही आरोप त्यांनी याचिकेत केला होता.

## सुडोकू क्रमांक-२६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | 6 | | | 4 | 7 | | |
| | 5 | 4 | 7 | | | 2 | | 1 |
| 7 | | | 1 | 2 | | | | |
| 3 | | | | 1 | | | | |
| 1 | 9 | 8 | | 6 | | 3 | 7 | 5 |
| | | | | 5 | | | | 4 |
| | | | | 7 | 3 | | | 9 |
| 4 | | 3 | | | 1 | 5 | 2 | |
| | | 1 | 2 | | | 8 | | 7 |

**सुविचार** डोक्यावर बर्फ व जीभेवर साखर असली की सारे प्रश्न आपोआप सुटतात.

## साप्ताहिक राशिभविष्य

**मेष-** आपले मन धार्मिक, अध्यात्मिककडे झुकल्याने मानसिक शांती मिळेल. जीवनसाथीकडून आपल्याला पूर्ण सहकार्य मिळेल.

**वृषभ-** व्यापारात अचानक परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. व्यापारात वाढ होईल.

**मिथुन-** मित्रांच्या सहकार्याने आपली अडकलेली काम पार पडतील. आपल्याला विशेषाधिकार प्राप्त होतील.

**कर्क-** आपल्या योजनेप्रमाणे कार्य पार पडतील. सौजन्यपूर्वक व्यवहार आपल्याला अडचणीतून वाचवील.

**सिंह-** मित्र व हितचिंताकांच्या भेटी होतील आईची तब्येत ठिक राहील. गृहोपयोगी वस्तू खरेदी करण्याचा योग चांगला चालेल.

**कन्या-** आपली बुद्धीवादी समस्या सुटेल. सुख समृद्धी वाढेल. हलगर्जीपणाची कामे टाळा. घाईगडबडीने कामे करू नका.

**तूळ-** जी कोणीही व्यक्ति आपल्या संपर्कात येईल तिला आनंदच वाटणार आहे. कामाच्या प्रती बेजबाबदार राहू नका.

**वृश्चिक-** नवीन योजना अमलात आणाल. परिवारात वातावरण चांगले राहील. आर्थिक स्थिती चांगली.

**धनु-** आवक-जावक वाढेल. चलाखीमुळे थांबलेली कामे पूर्ण होतील. यश, प्रतिष्ठा वाढेल.

**मकर-** कार्यक्षेत्रात भरभराटीचे योग आहेत. ओळख वाढेल. नवीन कामकाजामुळे आपल्याला मान मिळेल.

**कुंभ-** वाद-विवाद, भांडण तंटे होण्याची शक्यता. धंद्यात लक्ष द्या. वेळीच लक्ष न दिल्यास नुकसान होवू शकते.

**मीन-** व्यवहारात अडचणी येतील. परेशानी व धावपळ वाढेल. परिश्रमाच्या मानाने त्याचे फळ कमी मिळेल.




महाराष्ट्र शासन

Tel:- 022016973
Fax No. 022016975

ई- निविदा सूचना क्र.

1) https://mahapwd.com
2) http://mahatenders.gov.in

डीजीआयपीआर/ २०१८-२०१९/३१४४

हे मराठी साप्ताहिक **मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक राकेश गोरे** यांनी सोमानी प्रिंटींग, प्रेस गाला नं. ३-४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड नं. २,जवाहर नगर फाटक ब्रिज जवळ, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३. येथे छापून विष्णू सदन सोसायटी रामचंद्र सुखई सोसायटी नं. १, रूम नं. ४, जयहिंद नगर, खार (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. येथे प्रकाशित केले. R.N.I. NO. MAHMAR/2010/33301. Mob. 9892631863, 9892632268, 022-69998811, website:maharashatracrimetimes.com, **Email-Info@maharashtracrimetimes.com** maharashtracrimetimes33301@gmail.com, **कायदेशीर सल्लागार-** एडवोकेट, हाईकोर्ट मुंबई, डी. के. पांडे (बी.ए.एल.एल.बी.) हा अंक प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# ‘झोपु’अंतर्गत इमारतींमध्ये ३० हजारांहून अधिक रहिवाशांचे बेकायदा वास्तव्य

**मुंबई (सम्यक कासारे)-** झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत (झोपु) बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये ३० हजार ५६४ रहिवाशांचे बेकायदा वास्तव्य असल्याचे उघड झाले आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या पाहणीमधून ही बाब उघड झाली असून या तसेच या योजनेचा एकापेक्षा अधिकवेळा लाभ घेणाऱ्या रहिवाशांवर कारवाई करणार? अशी विचारणा न्यायालयाने राज्य सरकार आणि ‘झोपु’ प्राधिकरणाला केली आहे. बऱ्याच व्यक्ती ‘झोपु’ योजनेचा एकापेक्षा अधिकवेळा लाभ घेत असल्याचा आरोप करणारी याचिका शेख अब्दुल रहीम शेख यांनी केली आहे. शेख हे स्वत: ‘झोपु’ योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीत राहतात. मात्र या इमारतीतील ११ जणांनी ‘झोपु’ योजनेचे उल्लंघन करत घरे दुसऱ्याच्या नावावर वर्ग केली आहेत वा विकली आहेत, असा आरोप केला आहे. शिवाय या रहिवाशांनी ‘झोपु’ योजनेअंतर्गत अन्य ठिकाणी बांधण्यात आलेल्या इमारतीतही सदनिका मिळवली आहे, असा आरोपही त्यांनी केला आहे.



न्यायालयाने याचिकेतील मुद्याची गंभीर दखल याचिकेची व्याप्ती वाढवत मुंबई व अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना पाहणीचे आदेश दिले होते. त्यानुसार अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पाहणी केली होती. या पाहणीत ‘झोपु’अंतर्गत बांधण्यात आलेल्या ८६ हजार ४२९ घरांना भेट देण्यात आली.

# मेट्रोची कारशेड ‘आरे’तच!

**मुंबई (विशाल कारंडे)- कुलाबा-सीप्झ भुयारी मेट्रोच्या आरे वसाहतीमधील प्रस्तावित कारशेडला हरित लवादाच्या मुख्यपीठाने हिरवा कंदील दाखविला. लवादाच्या आदेशानंतर ‘वनशक्ती’ संस्थेने याचिका मागे घेतल्याने मुंबई मेट्रो रेल कॉपरेरेशनचा (एमएमआरसी) मार्ग मोकळा झाला आहे. सुमारे १८ हजार कोटी रुपये खर्चाच्या आणि ३३.५ किलोमीटर लांबीच्या आणि पूर्णतः भुयारी असलेल्या कुलाबा-सीप्झ मेट्रो-३चे काम सध्या जोरात सुरू आहे. मात्र मेट्रो कारशेड उभारण्यावरून तीन वर्षांपासून पेच निर्माण झाला होता.**

या कारशेडसाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असल्याचे सांगत ‘वनशक्ती’ या पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थेने हरित लवादाकडे २०१५ मध्ये याचिका दाखल केली होती. आरे वसाहतीत मोठ्या प्रमाणात झाडे असल्याने हा भाग वन म्हणून वा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील म्हणून जाहीर करावा, अशी त्यांची मागणी होती. या याचिकेवरील सुनावणीदरम्यान लवादाच्या पुणे पीठाने ‘आरे’त वृक्षतोडीस मनाई करतानाच तिथे डेब्रिज वा भराव टाकण्यावरही मेट्रो रेले कॉर्पोरेशनला अंतरिम बंदी घातली होती. दरम्यानच्या काळात केंद्र सरकारने मेट्रो कारशेडची जागा वगळून अन्य भाग पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील म्हणून जाहीर केला असून राज्य सरकारनेही या जागेत कोणतेही वन नसून ती जागा सरकारी मालकीचीच असल्याचा दावा केला होता.



लवादाच्या अंतरिम आदेशामुळे मेट्रो कारशेडचे काम काही महिने ठप्प होते. लवादाच्या निर्णयाविरोधात मेट्रो रेल कॉर्पोरेशनने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर याबाबत लवकर निर्णय घेण्याचे आदेश न्यायालयाने हरित लवादच्या मुख्य पीठास दिले होते. त्यावर गुरुवारी झालेल्या सुनावणीदरम्यान लवादाने ‘वनशक्ती’चे आक्षेप नाकारत याचिका फेटाळण्याचे संकेत दिले. त्या वेळी लवादाच्या सूचनेनुसार याचिकाकर्त्यांनी ही याचिका मागे घेतली.

# मालाड स्टेशनच्या झुडुपात सापडला मानवी सांगाडा, अंगावर महिलेचे कपडे

**मुंबई (प्रतिनिधी)-** मालाड रेल्वे स्टेशनच्या झुडुपामध्ये सोमवारी रेल्वे कामगारांना एक मानवी सांगाडा सापडला. या सांगाडयावर स्त्रीचे कपडे होते. त्यामुळे तो महिलेचा मृतदेह असण्याची शक्यता असल्याचे रेल्वे पोलिसांनी सांगितले. हा मृतदेह कलिना येथील न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवण्यात आला आहे. सांगाडयावर स्त्रीचे कपडे असल्यामुळे तो महिलेचाच मृतदेह आहे असे म्हणता येणार नाही. तो तृतीयपंथीयाचाही मृतदेह असू शकतो असे तज्ज्ञांनी सांगितले. सांगाडयाच्या डीएनए विश्लेषणांवरुन लिंग, वय शोधून काढता येईल असे तज्ज्ञांनी सांगितले. मालाड रेल्वे स्टेशनच्या उत्तरेला ट्रॅक नंबर



२ आणि ३ च्या मध्ये झुडुपात हा सांगाडा सापडला. सध्या इथे १५ डब्ब्यांच्या लोकलसाठी प्लेटफॉर्मच्या विस्तारीकरणाचे काम सुरु आहे. रेल्वे कामगार झुडुपे हटवत असताना त्यांचे या सांगाडयावर लक्ष गेले. लाल रंगाचा टॉप आणि ओढणी या सांगाडयावर होती. कामगारांनी लगेच रेल्वे पोलिसांना याची माहिती दिली. मृत व्यक्तीची उंची चार ते साडेचार फूट असावी. मागच्या दोन ते तीन महिन्यांपासून हा सांगडा इथे असावा असे रेल्वे पोलिसांनी सांगितले.

# फेरीवाल्यांवर कारवाईसाठी दहिसरमध्ये ‘कंत्राटी’ मदत

**मुंबई (योगेश होळंब)-** दहिसर परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्ध कारवाईसाठी पालिकेने अशासकीय संस्थांकडून कंत्राटी कामगारांची कुमक मागवली आहे. सोडत पद्धतीने अशासकीय संस्थेची निवड करण्यात येणार आहे. मात्र पालिकेकडे कामगारांची फौज असतानाही कंत्राटी कामगारांची मदत घेण्यात येत असल्याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.

दहिसर परिसरामध्ये अनधिकृत फेरीवाल्यांचा सुळसुळाट झाला असून फेरीवाल्यांनी पथाऱ्या पसरून अनेक ठिकाणचे रस्ते आणि पदपथ अडविले आहेत. या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी ‘आर-उत्तर’ विभाग कार्यालयाने पावले उचलली आहेत. मात्र, त्यासाठी कंत्राटी कामगारांचा पुरवठा करण्यासाठी इच्छुक असलेल्या अशासकीय संस्थांनी १४ सप्टेंबरपर्यंत ‘आर-उत्तर’ विभाग कार्यालयात अर्ज सादर करण्याचे आवाहन पालिकेकडून करण्यात आले होते. दाखल होणाऱ्या अर्जांमधून सोडत पद्धतीने २४ सप्टेंबर रोजी कंत्राटी कामगार पुरवठ्यासाठी अशासकीय संस्थेची निवड करण्यात येणार आहे. या संस्थांकडून उपलब्ध करण्यात येणाऱ्या कामगारांना पालिकेकडून प्रति दिन ५७६ रुपये वेतन देण्यात येणार आहे. ‘आर-उत्तर’ विभाग कार्यालयातील अधिकाऱ्यांनी मागणी करताच नेमणूक करण्यात आलेल्या अशासकीय संस्थेला कामगारांचा तात्काळ पुरवठा करणे बंधनकारक आहे. विनाविलंब, सक्षम कामगारांचा पुरवठा करण्यात अपयशी ठरणाऱ्या संस्थेवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे.

विविध १४४ संवर्गामध्ये तब्बल ५० हजार कामगार पालिकेच्या सेवेत कार्यरत आहेत. संवर्गानुसार ही मंडळी काम करीत आहेत. यापैकी साधारण ३०० ते ३५० कामगार अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी तैनात करण्यात आले असून पालिकेच्या २४ विभाग कार्यालयांमध्ये गरजेनुसार या कामगारांची नेमणूक करण्यात आली आहे. ही कुमक कमी पडल्यामुळेच ‘आर-उत्तर’ विभाग कार्यालयाला फेरीवाल्यांविरुद्धच्या कारवाईसाठी अशासकीय संस्थांच्या कामगारांची मदत घेण्याची वेळ आली आहे.

# कोस्टल रोडच्या कामाला अखेर मुहूर्त, आठ हजार कोटींचा खर्च

**मुंबई (महेश वारणकर)- मुंबईचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरलेल्या मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाच्या (कोस्टल रोड) कामाला अखेर मुहूर्त मिळाला. या प्रकल्पांतर्गत प्रिन्सेस स्ट्रीट ते बडोदा पॅलेसपर्यंतचे काम लार्सन अँड टुब्रो आणि बडोदा पॅलेस ते वरळी-वांद्रे सागरी सेतूचे टोक येथील काम हिंदुस्थान कंस्ट्रक्शन कंपनी व एचडीसी या संयुक्त कंपनीला मिळाले आहे. या प्रकल्पासाठी तब्बल आठ हजार कोटींचा खर्च करण्यात येईल. स्थायी समितीच्या बैठकीत हा प्रस्ताव मंजुरीसाठी मांडण्यात आला.**

मुंबईतील वाहतूककोंडीवर मात्रा म्हणून सागरी मार्ग म्हणजेच कोस्टल रोडची संकल्पना पालिकेने मांडली. हा शिवसेनेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. नरिमन पॉइंट ते मालाड मार्वेपर्यंत समुद्र किनारपट्टीलगत भराव टाकून मुंबई किनारा रस्ता प्रकल्पांचे काम हाती घेतले जाईल. भराव टाकून रस्ता बांधणे, काही ठिकाणी पूल, उन्नत मार्ग, आवश्यकतेनुसार बोगदे असे एकूण ३५.६० किमी लांबीच्या समुद्रकिनारी मुक्त मार्गाचे काम करण्यात येईल. प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल ते वांद्रे वरळी सागरी सेतूच्या वरळी टोकापर्यंतचे काम महापालिका करेल. प्रकल्पासाठी गिरगाव चौपाटी येथे भूमिगत बोगदा बांधण्यात येत आहे. चौपाटी येथून निघालेला हा बोगदा थेट प्रियदर्शनी पार्कजवळ बाहेर पडेल. त्यामुळे



काम सुरू असताना वाहतुकीला अडथळा होणार नाही. तिथून हा प्रकल्प वांद्रे सागरी सेतू ते गोराई असा प्रवास करेल. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहरातून उपनगरात जाण्यास दोन तासांचा प्रवास अवघ्या काही मिनिटांचा होईल.

# महागाई आणि जवानांचे शिरच्छेद हेच देशाचे भविष्य आहे का?-शिवसेना

**मुंबई (धनश्री सट्टा)- इंधनाचे वाढत चाललेले दर आणि सीमेवर जवानांचे होणारे शिरच्छेद हेच देशाचे भविष्य आहे का? असा प्रश्न विचारत शिवसेनेने पुन्हा एकदा मोदी सरकारवर टीकेची तोफ डागली आहे. इतकेच नाही तर राम मंदिर आणि हिंदुत्त्व या दोन मुद्द्यांवरूनही शिवसेनेने सरकारला खडे बोल सुनावले आहेत. सरसंघचालक मोहन भागवत यांनी वडिलकीच्या नात्यांने राज्यकर्त्यांचे कान उपटावेत असाही सल्ला शिवसेनेने दिला आहे. सामनाच्या अग्रलेखातून ही टीका करण्यात आली आहे.**

मोहन भागवत यांनी राम मंदिर प्रश्नी मांडलेली भूमिका सचोटीची आहे पण राज्यकर्त्यांच्या अंतरंगात त्या सचोटीचा अंश तरी उरला आहे का? असाही प्रश्न विचारण्यात आला आहे.

सरसंघचालक मोहन भागवत यांनी नवी दिल्लीत सांगितले की, अयोध्येत लवकरात लवकर राम मंदिर व्हायला हवे. संघातर्फे दिल्लीत तीन दिवसांची एक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. ही व्याख्यानमाला हिंदुस्थानचे भविष्य वगैरे अशा विषयांवर होती. व्याख्यानमाला संपल्यावर सरसंघचालकांनी लोकांच्या मनातील प्रश्नांना उत्तरे दिली. राम मंदिराचे काय होणार, हा प्रश्न पुन्हा चिघळवला जात आहे. ३७० कलमाबाबत आमची भूमिका स्पष्ट असल्याचे भागवत म्हणतात. ३७० कलम हटवल्याशिवाय कश्मीर हा हिंदुस्थानचा भूभाग होणार नाही अशी संघाची भूमिका होती व त्या मतांशी ते कायम असतील तर ३७० कलम हटविण्यास विरोध करणाऱ्या मेहबुबा मुफ्तीसोबत कश्मिरात भाजपने सरकार स्थापन केले त्याचे काय? ३७० कलम हटवले तर दंगे उसळतील असे मेहबुबांचे सांगणे होते. तरीही तिच्याशी सत्तेसाठी निकाह लावणे योग्य होते काय व हा निकाह लावण्यात ‘काझी’ची भूमिका पार पाडणारे राम माधव यांच्यासारखे संघ स्वयंसेवकच होते. राम



मंदिर हा प्रचाराचा आणि निवडणुकीचा मुद्दा बनला आहे आणि त्यामुळे हिंदुत्व चेष्टेचा विषय बनत चालला आहे. उत्तरेतील एका भाजपच्या नेत्याने तर अशी मुक्ताफळे उधळली आहेत की, खुद्द पंतप्रधान मोदीही हादरले असतील. सुप्रीम कोर्टात भाजपचे वजन आहे. त्यामुळे राम मंदिरप्रश्नी आम्ही न्यायालयातून पाहिजे तसा आदेश घेऊन येऊ. राम मंदिराचा प्रश्न हा अशा काही मंडळींनी इतक्या खालच्या थराला नेऊन ठेवला आहे. राम मंदिर हा सेटिंग, मांडवली किंवा व्यापार आहे काय हे आधी स्पष्ट व्हायला हवे.

# मुंबईच्या सुधारित विकास आराखड्यातील फेरबदलांना मंजुरी: सुनियोजित विकासाला चालना मिळणार



**मुंबई (अमोल गुडेकर)-** मुंबईच्या नागरी पुनर्निर्माणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राच्या सुधारित विकास आराखड्याला राज्य शासनाने यापूर्वीच मंजूरी दिली आहे. मात्र, आता यामधील विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील फेरबदलांचीही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन त्यालाही अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे मुंबईतील सुनियोजित विकासाला चालना मिळणार आहे. मुंबई महानगराचे नवनिर्माण योग्य प्रकारे व्हावे यासाठी अत्यंत महत्वाचा असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राचा सुधारित विकास आराखडा-२०३४ हा सर्व संबंधित घटकांच्या आकांक्षा लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. महानगर पालिकेच्या माध्यमातून राज्य शासन यावर काम करीत आहे. हा आराखडा सात महिन्यांत मंजूर करण्यात आला आहे. या आराखड्याच्या माध्यमातून विकासाला मोठा वाव मिळणार आहे.

# खेरवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेवारस मृतदेह



खेरवाडी पोलीस ठाण्यास एका अनोळखी इसमाचा मृतदेह मिळाला असून त्याची माहिती पुढील प्रमाणे आहे. अनोळखी मयत पुरुष असून वय अंदाजे ४५ वर्षे आहे. खेरवाडी पोलीस ठाण्यास भाभा रुग्णालया, बांद्रा (प.), मुंबई कडून ही बातमी मिळाली. सदर इसमाचा मृतदेह दिनांक १९-०८-२०१८ रोजी सकाळी ६ वाजता मिळाला आहे. तरी या मृतदेहास ओळखणाऱ्या व्यक्तिने खेरवाडी पोलिस ठाण्यास संपर्क करावा. असे आव्हान पो.उ. नि. अमोल चव्हाण, पो. उ. नि. संग्राम बागल यांच्याकडून करण्यात आले आहे.

# मुंबईत उभारली जाणार शिवाजी महाराजांच्या स्मारकाची २५ फूट उंच प्रतिकृती

**मुंबई (हर्षद परब)-** अरबी समुद्रात उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या आधी मुंबईत स्मारकाची प्रतिकृती उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दक्षिण मुंबईत ही प्रतिकृती उभारण्यात येणार असून याची उंची २५ फूट असणार आहे. प्रतिकृतीच्या सहाय्याने तज्ञ, सामान्य मुंबईकर आणि विशेष म्हणजे पर्यकांकडून त्यांची मतं आणि सल्ले जाणून घेण्यात येणार आहेत. समुद्रात उभारण्यात येणाऱ्या स्मारकासाठी राज्य सरकारने एल अँण्ड टी कंपनीकडे स्मारकाच्या बांधकामाची जबाबदारी सोपवली आहे. हे स्मारक तीन वर्षांत पूर्ण करण्यात येणार असून या स्मारकासाठी राजभवनापासून १.२ किलोमीटर आणि गिरगाव चौपाटीपासून ३.६ किलोमीटर तर नरिमन पॉइंट पासून २.६ किलोमीटर अंतरावर असलेली जागा निश्चित करण्यात आली आहे.



वर्षाच्या सुरुवातीला काम सुरु होईल अशी अपेक्षा आहे. ‘फक्त तज्ञ आणि मुंबईकरच नाही तर आम्ही पर्यटकांकडूनही सल्ले घेणार आहोत. प्रतिकृती उभारण्यासाठी अद्याप जागेची निवड झालेली नसून त्याचा शोध सुरु आहे. फाऊंटन, काळा घोडा, गेटवे ऑफ इंडिया किंवा नरीमन पॉईंट यापैकी एका जागेची निवड करण्यात येईल.


महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,

12 SEP 2018

डीजीआयपीआर/२०१८-२०१९/३१३३

# सोन्याच्या दरात मोठी वाढ, चांदीच्या भावात घसरण



**मुंबई (प्रतिनिधी)-** सोन्याच्या दरात सराफ बाजारात सोमवारी तेजी पाहायला मिळाली. मात्र चांदीच्या भावात मोठी घसरण पाहायला मिळाली. स्थानिक बाजारात सोन्याच्या घसरणीकडे दुर्लक्ष करण्यात आलं. याचमुळे दिल्लीत सराफ बाजारात वाढ पाहायला मिळाली. प्रत्येक १० ग्रॅमवर १०० रुपयांची वाढ झाली असून ३१,५५० रुपये असा आताचा दर आहे.

तर चांदीच्या भावात ५० रुपयांची घसरण पाहायला मिळाली. चांदीचा दर ५० रुपयांनी खाली आला असून आता ३८,१०० रुपये पर्यंत पोहोचला आहे. चांदीचा दर खाली पडण्यामागे इंडस्ट्रीयल युनिट आणि सिक्के बनवणाऱ्यांचा मुख्य हेतू आहे. सिंगापूरमध्ये सोन्याचा दर ०.१३ टक्क्यांनी खाली आला असून १,१९७.२० डॉलर आहे. आता अशी माहिती मिळतेय की, चीनने अमेरिकेसोबत होणाऱ्या व्यापाराची चर्चा थांबवली आहे. यामुळे डॉलरमध्ये मजबूती पाहायला मिळाली आहे. स्थानीक बाजारात ९९.९ टक्के शुद्ध सोन्याच्या दरात वाढ १०० रुपयांनी झाली आहे. क्रमशः हा दर ३१,५५० रुपये आणि ३१,४०० रुपये प्रति १० ग्रॅमपर्यंत पोहोचला आहे. तर शनिवारी सोन्याचा दरात २५० रुपयांची घसरण पाहायला मिळाली.

# लिंगबदल करुन बारबाला बनण्याचं स्वप्न भाच्याचा मावशीच्या सोन्यावर डल्ला

**नागपूर (अभिजीत येरल्लु)-** लिंगबदल करुन बारबाला बनण्यासाठी नागपुरातील एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलाने मावशी आणि तिच्या मैत्रिणीच्या तब्बल ५२ तोळे सोन्यावर डल्ला मारल्याचं उघडकीस आलं आहे. धक्कादायक म्हणजे मावशीला मुंबईत डान्सबारमध्ये काम करुन मिळणारा पैसा पाहून, त्याला आपण लिंग बदलून मुलगी बनावं आणि डान्सबारमध्ये काम करावं असा विचार आला होता. आठवीत शिकणाऱ्या १४ वर्षीय मुलाची मावशी डान्सबारमध्ये काम करुन मोठी कमाई करत असे. सुट्ट्यांमध्ये मुंबईत गेल्यावर मावशीचं राहणीमान, तिची ऐश आणि तिला मिळणारा पैसा पाहून तो भारावून गेला होता. त्यामुळे आपणही जर मुलगी झालो आणि बारबाला बनलो तर या माध्यमातून बक्कळ पैसा मिळवू शकतो, असा विचार त्याच्या मनात नेहमीच यायचा. शिवाय तो मुलांपेक्षा मुलींमध्येच जास्त रामायचा. त्याला मुलींसारखे नटायला आवडायचं. निसर्गाने ज्याला मुलगा म्हणून घडवलं होतं, त्याची मुलगी



बनण्यासाठीची उत्कट इच्छा घराजवळच राहणाऱ्या आणि खास मैत्रीण असलेल्या १९ वर्षीय रेहानाने हेरली. या मुलाला मुलगी बनवण्याचं स्वप्न दाखवून लुबाडता येईल, असं तिला वाटलं. त्यामुळे रेहानाने त्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन तुला मुलगी बनता येईल, मात्र त्यासाठी डॉक्टर भरपूर पैसे घेईल, आपल्याकडे पैसे आले तर तुझे स्वप्न पूर्ण होईल, असं तिने सांगितलं. बार डान्सर असलेल्या मावशीला तिचे आणि आणखी एका मैत्रिणीचे ५२ तोळे दागिने मुंबईच्या लॉकरमध्ये ठेवण्यात अडचणी येत असल्याने, ती ६ ऑगस्ट २०१८ रोजी नागपुरात आली. नागपुरच्या बँकेत दागिने ठेवण्यासाठी मॅनेजरने तिला ८ ऑगस्टला बोलावलं होतं. मात्र त्याआधीच मुलाने घरातील कपाटात ठेवलेले दागिने घेतले आणि थेट रेहानाकडे पोहोचला. रेहानाने इम्रान आणि फारुख नावाच्या मित्रांच्या मदतीने मुलाला आठ दिवस नागपूरच्या पारडी भागातील एका घरात ठेवलं. या काळात रेहानाने मुंबईतील कोपरखैराणेमधील सेक्टर १९ मधील एका अपार्टमेंटमध्ये फ्लॅट भाड्याने घेतला आणि त्यानंतर मुलाला घेऊन मुंबईला रवाना झाले.

# चुंबन घेताना संतापलेल्या पत्नीने नवऱ्याची कापली जीभ

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)-** दिल्लीमधील रनहोला येथे एका विवाहित पत्नीने चुंबन घेताना चक्क नवऱ्याची जीभ कापली असल्याची विचित्र घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी शेजारपाजारी चौकशी केली असता महिलेचे आपल्या नवऱ्याबरोबर सततचे भांडण व्हायचे म्हणूनच तिने असं केलं असावं, अशी माहिती मिळाली होती. मात्र नवरा चांगला दिसत नाही म्हणून संतापाच्या भरात आपण त्याची जीभ चावल्याचं तिनं म्हटलं आहे. रहनोला येथील एका विवाहित पत्नीचे तिच्या नवऱ्यासोबत काही दिवसांपूर्वीच मोठं भांडण झालं होतं. मात्र भांडणानंतर काही दिवसांनी या दोघांनी एकत्र



राहण्यास सुरुवात केली होती. परंतु एकदा नवऱ्यासोबत चुंबन करतानाच पत्नीने त्याची जीभ इतक्या जोरात चावली की कापली गेली. या घटनेनंतर जखमी नवऱ्याला तेथील स्थानिक रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. त्यानंतर पीडित नवऱ्यावर सफदरजंग येथे उपचार करण्यात आले आहेत.

# कुरकुरे देण्याच्या बहाण्याने ३ वर्षीय चिमुरडीवर बलात्कार; पुण्यातील धक्कादायक घटना

**पुणे (अभिजीत येरल्लु)-** पाषाण परिसरातील सोमेश्वरवाडीत खाऊ देण्याच्या बहाण्याने तीनवर्षीय मुलीवर तिच्या ओळखीतील तरुणाने बलात्कार केल्याची घटना उघडकीस आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी शंभुकुमार दुखी राय (२१, बिहार) नामक तरुणास अटक केली आहे. शनिवारी दुपारी साडेपाच वाजेच्या सुमारास पीडित मुलगी घराजवळ खेळत होती. त्यावेळी तिच्या गावाकडील ओळखीच्या शंभुकुमारने तिला कुरकुरे खाण्यास दिले आणि त्या भागातील वृध्दाश्रमामागील झुडूपात नेले. तिथे तिला मारहाण केली आणि त्यानंतर तिच्यावर बलात्कारही केला. त्यानंतर तिला घटनास्थळी टाकून आरोपी पळून गेला.

# गांधी कुटूंब भ्रष्टाचाराची जननी; राफेलवरून सरकारचा पलटवार

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)-** राफेल करारावरून दिल्लीतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी या प्रकरणावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार हल्ला चढवत चौकीदार चोर निघाल्याचा आरोप केला. तर त्याला कायदामंत्री रविशंकर प्रसाद यांनी सरकारच्यावतीने प्रत्युत्तर दिले.



तसेच पंतप्रधानांवर केलेली टिपण्णी निंदणीय असून राहुल गांधींना राफेलची किंमत जाणून घेऊन पाकिस्तानला मदत करायची आहे, असा पलटवार केला.

पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी राफेल करारात अनिल अंबांनीच्या फायदा करून देण्याचा प्रयत्न सरकारने केल्याचा आरोप केला. तसेच यावरून मोदी सरकारवर आरोपांच्या फैरी झाडल्या. त्यानंतर सरकारच्या वतीने रविशंकर प्रसाद यांनी पत्रकार परिषद घेऊन बाजू मांडली.

राहुल यांनी प्रामाणिकपणाचे प्रतीक आणि जागतिक नेतृत्व असणाऱ्या नेत्याला चोर म्हटले आहे. स्वातंत्र्यापासून कोणत्याही पक्षाच्या नेत्याने पंतप्रधानांवर अशी आक्षेपार्ह टिपण्णी केलेली नाही. राहुल यांच्याकडून याशिवाय दुसरी अपेक्षाही करू शकत नाही. त्यांच्याकडे कोणतीही क्षमता नाही, परंतु केवळ कुटुंबामुळे ते त्या ठिकाणी आहेत, अशा शब्दांत प्रसाद यांनी राहुल गांधीवर टीकास्त्र सोडले.

गांधी कुटूंब हे भ्रष्टाचाराची जननी आहे. त्यांच्याच काळात कोळसा घोटाळा, २ जी स्पेक्ट्रम घोटाळा, आदर्श घोटाळे झाले आणि त्यांच्या मुख्यमंत्र्यांना राजीनामे द्यावे लागले. राहुल गांधी स्वत: आपल्या आईसह भ्रष्टाचार, जमीन, शेयर लूट अशा प्रकारांत सहभागी आहेत. आपल्या बहिणीच्या पतींनी लुबाडलेल्या जमीन प्रकरणावर ते गप्प राहिले. त्यांचा कुटुंबाने बोफोर्स प्रकरणात लाच घेतली. तेव्हाही राहुल गप्पच राहिले. आता देशातील आणि जगातील कोणीही राहुल यांच्यावर विश्वास ठेवणार नाही, असे प्रसाद म्हणाले.

# देशाला रामायण, महाभारताची गरज नाही: पवारांचा भगवतांना टोला: 'प्रकाश आंबेडकरांनी धर्मनिरपेक्षता शिकवू नये'

**मुंबई (विशाल कारंडे)-** 'रामायण, महाभारताची देशाला गरज नाही. मुस्लिम, ख्रिश्चन हे या देशाचेच घटक असून मला जेवढा अधिकार आहे तेवढाच अधिकार त्यांना आहे. ते देशाचे हिस्सेदार आहेत, हे कुणीही सांगण्याची आवश्यकता नाही. ते जन्मत:च या देशाचे नागरिक आणि हिस्सेदार आहेत', असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुस्लिमांबाबत वक्तव्य करणाऱ्या सरसंघचालक मोहन भागवत यांना लगावला.

'भारिप'चे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी राष्ट्रवादी पक्ष धर्मनिरपेक्ष नसल्याच्या टीकेलाही



पवारांनी प्रत्युत्तर दिले. 'आमची मदत जेव्हा घेतली तेहा आम्ही धर्मनिरपेक्ष नव्हतो का?' असा प्रतिसवाल करत प्रकाश आंबेडकरांनी आम्हाला धर्मनिरपेक्षता शिकवण्याची गरज नाही, असेही पवार यांनी ठणकावले. पवार म्हणाले, 'प्रकाश आंबेडकर म्हणतात, राष्ट्रवादी काँग्रेस धर्मनिरपेक्ष नाही. राष्ट्रवादी धर्मनिरपेक्ष नसता तर अकोल्यात दोन निवडणुकांत त्यांनी आमचा पाठिंबा घेतला नसता. तेथे प्रचाराला शरद पवार नव्हे तर राष्ट्रवादीचेच कार्यकर्ते होते. तेव्हा ते धर्मनिरपेक्ष वाटत होते, मग आता का नाहीत. मला नक्की वर्ष आठवत नाही, परंतु ईशान्य मुंबईत आमच्या उमेदवाराला पाडण्यासाठी प्रकाश आंबेडकर यांच्या पक्षाने नीलम गोऱ्हेंना उभे केले होते. त्याचा लाभ प्रमोद महाजनांना झाला होता. भाजपला लाभ पोहोचवण्यासाठी उमेदवार उभे करण्याची ऐतिहासिक कामगिरी करणारे लोक इतरांना कोण धर्मनिरपेक्ष आहे, कोण नाही, असे सांगत आहेत' असा टोलाही पवारांनी लगावला.

# नोटाबंदी, जीएसटी हा तुघलकी निर्णय -शत्रुघ्न सिन्हा

**नागपूर (प्रतिनिधी)-** विद्यमान सरकारने नोटाबंदी व जीएसटीबाबत घेतलेले निर्णय हे मंत्रिमंडळाचे किंवा भाजपाचे नाहीत. तर ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांना विश्वासात न घेता घेतले आहेत. हे निर्णय काळे धन आड मार्गाने पांढरे करण्याचा तुघलकी निर्णय आहे, असा गंभीर आरोप भाजपचे नेते खा. शत्रुघ्न सिन्हा यांनी केला.

काटोल येथे काटोल फेस्टीवहलचे आयोजन करण्यात आले असून, त्याअंतर्गत आयोजित 'युवा संसद'मध्ये ते बोलत होते. खा. संजयसिंग यांनीही सरकारच्या धोरणांवर सडकून टीका करीत सरकार देशातील बंधुभाव संपविण्याचे काम करीत असल्याचा आरोप केला. छोटी राज्ये विकासाच्या



दृष्टीने सोयीची असल्याचे सांगून त्यांनी विदर्भ राज्याच्या मागणीचे समर्थन केले. आशीष देशमुख यांनी रामदेवबाबांनी काटोल येथे उद्योग उभारण्याचे आश्वासन देऊन साधे शेडही उभारले नाही, असा आरोप केला. मात्र, पक्षाचे सदस्यत्व अथवा आमदार पदाच्या राजीनाम्याबाबत ते काहीही बोलले नाही. प्रास्ताविक विद्याराज कोरे यांनी केले तर संचालन प्राचार्य डॉ. विजय धोटे यांनी केले. उत्कर्ष पवार यांनी आभार मानले. शत्रुघ्न सिन्हा म्हणाले, माझ्याबाबत विविध कंड्या पिकविल्या जात आहे. पक्षविरोधी कारवाया करीत असल्याचा आरोप केला जात आहे. मी सर्वाधिक मताधिक्क्याने विजय संपादन केला असला तरी मला उमेदवारी न देण्याची धमकी दिली जात आहे. या सरकारने खरे बोलण्याचे स्वातंत्र्य हिरावून गेतले आहे.

# आता पाक आणि दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर देण्याची वेळ -लष्कर प्रमुख

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)-** पाकिस्तानी सैन्याचे रानटी कृत्य आणि जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी कारवायांविरोधात आता 'जशात तशे' उत्तर देण्याची वेळ आली आहे, असा इशारा आर्मी चीफ जनरल बिपीन रावत यांनी दिला आहे. दहशतवादाविरोधात आता कडक कारवाई करण्याची गरज आहे. आता प्रत्युत्तर देण्याची वेळ आली आहे. पाकिस्तानशी आता चर्चा होऊ शकत नाही. सरकारची भूमिका स्पष्ट आहे की चर्चा आणि दहशतवाद यावर एकत्रित चर्चा होणार नाही, असेही रावत यांनी नमूद केले आहे. भारत, पाक दरम्यानच्या द्विपक्षीय बैठकीला भारताने नकार दिल्याने पाकचे पंतप्रधान इम्रान खान यांनी ट्विटरच्या माध्यमातून नाराजी व्यक्त



केली आहे. त्यानंतर लगेच लष्कर प्रमुखांनी पाकिस्तान सैन्याच्या रानटी कृत्यांविरोधात कडक कारवाईचे संकेत दिले आहेत.

# चीनने 'त्या' १० लाख मुस्लिमांना का डांबून ठेवलंय?

**बीजिंग (वृत्तसंस्था)-** सक्तीच्या व्यवस्थेसाठी कुख्यात असलेल्या चीन प्रशासनाकडून १० लाख युइघूर मुस्लिमांची पुनर्शिक्षणाच्या नावाखाली नाकेबंदी केल्याने जगभरातील मुस्लीमबहुल देशांमधून संतापाची लाट पसरली आहे. चीनमधील झीनझियांग प्रांत मुस्लीमबहुल म्हणून ओळखला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या एका समितीने पाहणी केल्यानंतर ही बाब समोर आली. झीनझियांग प्रांतातील युइघूर मुस्लीमांच्या मशिदी बंद करण्यात आल्या आहेत. प्रांताच्या सीमाही सील करण्यात आल्या आहेत.



तुर्की भाषा बोलणारे चीन मधील युईघूर मुस्लीम अल्पसंख्याक समूदाय आहे. ते बहुतांश सुन्नी मुस्लीम आहेत. त्यांचे सांस्कृतिक तसेच धार्मिक रितीरिवाज मध्य आशियाशी मिळताजुळते आहेत. चीनमधील झीनझियांग प्रांताला काहीजण पूर्व तुर्कस्थान असाही उल्लेख करतात. चीनमधील झीनझियांग प्रांत हा तसा संवेदनशील असल्याने त्या ठिकाणी व्यवस्था निर्माण करणे हे चीनसाठी आतापर्यंत आव्हानात्मक राहिले आहे. त्या प्रांतातील फुटीरतावादी संघटना सरकारी नियमांना फेटाळून लावतात. सन २००९ मध्ये तेथे झालेल्या हिंसाचारात २०० जणांचा मृत्यू झाला होता. २०१३ मध्ये चीनमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये चौघा युईघूर मुस्लीमांना शिक्षा सुनावली होती. त्यामध्ये तिघांना फाशीची शिक्षा झाली. चीन उजव्या विचारधारा असलेल्या गटांकडून युईघूर यांच्यावर करण्यात येत असलेल्या कारवाईवर समर्थन करण्यात येत आहे. झीनझियांग प्रांतामध्ये अभूतपूर्व सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. सुरक्षा कॅमेरे, पोलिस स्टेशन्स आणि चेक पॉईंटची संख्या वाढवण्यात आली आहे. युइघूर मुस्लीमांना त्यांच्या वाहनांवर सॅटेलाईट ट्रॅकिंग प्रणाली बसविण्याचा आदेश देण्यात आला आहे. इतकचं नव्हे, तर मार्केटमध्ये तसेच पेट्रोल पंप फेस स्कॅन सक्तीचे करण्यात आले आहे.

# एक दोन नाही, तर 'या' महिलेने १० जणांशी विवाह करून केली फसवणूक!

**नाशिक (सुनील आढाव)-** नाशिकच्या नांदगावमध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका महिलेने वेगवेगळ्या ठिकाणी तब्बल १० लग्न करून पुरुषांची फसवणूक केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. मॅरेज ब्युरोच्या नावाखाली हा गोरख धंदा सुरू होता. त्यातून या महिलेने तब्बल १० विवाह केले आहेत आणि लोकांची फसवणूक केली आहे. पोलिसांनी या प्रकरणी मुख्य आरोपीसह फसवणूक करणाऱ्या ३ महिलांना अटक करून त्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. लग्नाच्या नावाखाली फसवणूक करणारं हे मोठं रॅकेट असल्याची शक्यता पोलिसांकडून वर्तवण्यात आली आहे. एकाशी लग्न केल्यानंतर वारंवार काहीतरी कारणं सांगून ही महिला तिच्या माहेरी जायची आणि आपला फोन बंद ठेवायची आणि त्याच काही दिवसात ती एका



नव्या पुरुषाशी विवाह करायची. तिथेही एक वेगळं कारण देत ती तिच्या आधीच्या घरी जायची. अशा प्रकारे या महिलेने चक्क १० लग्न केली होती आणि प्रत्येकाला पैशांसाठी फसवत असे. या सगळ्यात महिलेसोबत तिचे काका-काकू आणि इतर कुटुंबियांचा देखील हात आहे. ही महिला वेगवेगळ्या नावाने आणि ओळखीने इतरांशी लग्न करायची.

# महामार्गावरील दरोड्याचा छडा; कर्नाटकातून आठ जणांना अटक

**ठाणे (राकेश गायकवाड)-** मुंबई-नाशिक महामार्गावरील खारेगाव टोलनाक्यावर कार अडवून आतील लोकांना मारहाण करत त्यांच्याकडील चार लाख ४२ हजारांचा ऐवज चोरून पळ काढणाऱ्या आठ जणांच्या टोळीचा ठाणे गुन्हे शाखा युनिट-१ने छडा लावला. आरोपींना गुलबर्गा (कर्नाटक) येथून अटक करण्यात आली. ही टोळी जनावरांची चोरी करून विक्री करत असल्याचेही उघडकीस आले आहे. गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त दीपक देवराज यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत या कारवाईची माहिती दिली. ठाणे न्यायालयाने सर्व आरोपींना २५ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. टोळीकडून एक कार, रोख रक्कम, पाच मोबाईल आणि जनावरांना गुंगी देणाऱ्या औषधांच्या तीन बाटल्या व इंजेक्शन असा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. टोळीचा म्होरक्या फरार आहे. तक्रारदार सोहेल शेख व नौशाद शेख हे ११ सप्टेंबरला डोंगरी येथून मालाचे पैसे घेऊन कारने संगमनेरकडे जात होते. खारेगाव टोलनाक्यावर दरोडेखोरांनी त्यांची कार अडवून आतील लोकांना मुंब्रा बायपासवर नेत मारहाण केली होती.

# पाकिस्तानी नेत्याचं पंतप्रधानपदासाठी राहुल गांधींना समर्थन करणारं ट्विट

**इस्लामाबाद (वृत्तसंस्था)-** पाकिस्तानने भारताच्या राजकारणात घुसखोरी करण्याची तयारी सुरु केली आहे. पाकिस्तानचे माजी गृहमंत्री रहमान मलिक यांनी ट्विट करत काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांचं कौतूक करत राहुल गांधी भारताचे पुढचे पंतप्रधान बनणार असल्याचं म्हटलं आहे. पाकिस्तानचे माजी गृहमंत्री रहमान मलिक यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय लष्कर प्रमुख जनरल बिपीन रावत यांच्यावर देखील टीका केली आहे. मलिक यांनी राहुल गांधी यांचा एक व्हिडिओ शेअर देखील केला आहे. 'राहुल यांचा सुंदर व्हिडिओ असं देखील त्यांनी सोबत म्हटलं आहे.

दुसरीकडे काँग्रेसने पाकिस्तानचे माजी गृहमंत्री रहमान मलिक यांच्या वक्तव्याची निंदा केली आहे. काँग्रेस नेते राशिद अल्वी यांनी म्हटलं की, 'आम्ही पाकिस्तानकडून कोणत्याही प्रकारचा प्रचार मागितलेला नाही. जगाला माहित आहे की, राहुल गांधी भविष्यात पंतप्रधान होतील. आम्ही रहमान मलिक यांच्या वक्तव्याची निंदा करतो. पंतप्रधान मोदींसोबत आमचे मतभेद असले तरी ते आमचे पंतप्रधान आहेत.'

MEDIA 9 Advertising
For Advertise on
TV9 | IBN लोकमत | NEWS18 लोकमत | साम TV
Birthday / Anversery Wishes ,
Commercial Advt / Corporate Advt
Contact Today - 8655556626
We Also Develop Website and Mobile Apps